N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** करमाळा **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0960 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/10/2021 02:31 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 13/10/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/10/2021

**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/10/2021 **Time (वेळ):** 02:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 007 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/10/2021 02:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती करमाळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदिपान मारुती गलांडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1963 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडशिवणे, ता करमाळा, ,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वडशिवणे, ता करमाळा, ,करमाळा ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शशिकांत तुकाराम वलेकर | | | 1. करमाळा पोलीस ठाणे ,करमाळा , सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्कुवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 14.10.2021मी संदिपान मारुती गलांडे, वय 58 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. वडशिवणे, ता. करमाळा, जि. सोलापूर समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझी मौजे वडशिवणे येथे वडीलोपार्जित शेती असुन सदरच्या शेतीमध्ये मी, माझी पत्नी सौ.लताबाई गलांडे, मुलगा अक्षय गलांडे असे कष्टकरुन सदरच्या शेतीतुन मिळणाऱ्या उत्पनातुन माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवितो. माझ्या शेता शेजारीच माझा लहान भाऊ बाळु मारुती गलांडे याची शेती आहे.दि. 08.10.2021 रोजी सकाळी 08.00 वा. सुमारास मी शेतामध्ये काम करत असताना, माझा लहान भाऊ बाळु गलांडे व माझ्यात शेतामधील रस्त्याच्या कारणावरुन भांडण सुरु झाले. त्यावेळी माझा मुलगा अक्षय गलांडे हा सदर ठिकाणी भांडण सोडविण्यासाठी आला असता, त्यास माझा लहान भाऊ बाळु गलांडे त्याचा मुलगा ऋ षिकेश गलांडे या दोघांनी मिळुन माझ्या मुलास व मला मारहाण केली. त्यामध्ये माझ्या मुलाच्या डोक्यास मार लागुन तो जखमी झाला. त्यामुळे मी माझ्या लहान भाऊ बाळु व त्याचा मुलागा ऋ षिकेश यांच्याविरुध्द करमाळा पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुरनं.936/2021, दि. 08.10.2021 रोजी गुन्हा दाखल केला आहे. त्याचदिवशी माझ्या लहान भावाने मी, माझी पत्नी लताबाई, व मुलगा अक्षय असे तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. दि.09.10.2021 रोजी मला करमाळा पोलीस ठाणेचे पोलीस वलेकर यांनी ते सदर गुन्हयाचा तपास करीत असून त्यांना भेटण्याकरिता मला करमाळा पोलीस ठाणेस बोलविले. माझ्याकडून सदर गुन्हयाची माहिती घेतल्यावर पोलीस वलेकर यांनी सदर गुन्हयात माझ्या पत्नीस अटक न करण्यास व गुन्हयात मदत करणेकामी पहिल्यांदा त्यांना साहेबांनी 25000/- रुपये सांगितले आहेत असे मला सांगितले. सदरची रक्कम मोठी असल्याने व ती देणे मला शक्य नसल्याने मी पोलीस वलेकर यांना साहेबांची भेट घेवून त्यांना विनंती करतो असे बोललो असता, पोलीस वलेकर यांनी साहेबांना भेटायची गरज नाही, मी तुम्हाला गुन्हयात मदत करतो असे सांगुन मला पोलीस निरीक्षक साहेबांना भेटू दिले नाही. त्यानंतर काल दि.12.10.2021 रोजी मला पुन्हा पोलीस वलेकर यांनी पोलीस ठाणेस बोलविले असता, माझ्या पत्नीस अटक न करण्यास व गुन्हयात मदत करणेकामी माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी केली असुन मला आज दि.13.10.2021 रोजी सदरची रक्कम घेवून येण्यास सांगितले आहे. सदरचे 10,000/- रुपये ही रक्कम ते लाच म्हणून मागणी करीत आहेत याची मला खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची अजीबात इच्छा नाही. माझा व सदर पोलीस वलेकर यांच्याशी यापुर्वी कोणतेही भांडण तंटा नाही, अगर पैसे घेणे-देणेचा व्यवहार प्रलंबित नाही. म्हणून मी ऍन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयास संपर्क साधला व त्यांना थोडक्यात माझी तक्रार सांगितली. तेथील अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. कोळी यांनी माझी तक्रार ऐकुन त्यांनी मला दिनांक 13.10.2021 रोजी करमाळा गावाचे अलिकडे टेंभुर्णी रोडला येवून थांबावयास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 13.10.2021 रोजी 13.00 वा. करमाळा गावचे अंदाजे 2 किमी अलिकडे येवून थांबलो. त्यावेळेस पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी हे त्यांचे स्टाफसह तेथे खाजगी वाहनाने आले. पोनि कोळी यांनी मला वाहनामध्ये बोलावून घेवून त्यांची व तेथे उपलब्ध असलेल्या जिल्हा परिषद सोलापूर या कार्यालयातील

शासकीय पंच श्री पांडुरंग कविटकर व श्री नागेश कोमारी यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी पोलीस वलेकर यांचे विरूध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. मला लिहीता वाचता येत नसल्याने पोनि कोळी यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष माझ्या सांगणेवरुन माझ्या मुलाने सदरची तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार पोनि कोळी व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करित असल्याचे आम्हास सांगितले. त्यासाठी आम्हास रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी व माझ्या सोबत पंच नं 1 कविटकर यांना सुचना दिल्या की आम्ही करमाळा पोलीस ठाणे येथे जावून तेथे पोलीस वलेकर यांची भेट घेवून त्यांच्याशी माझे कामाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 कविटकर यं ना दिल्या. त्यानंतर मला व पंच नं.1 कविटकर यांना करमाळा पोलीस ठाणे येथे माझ्या गळ्यात रेकर्डर शर्टाचे आतील बाजूस चालु करुन आडकावून माझे मुलाने आणलेल्या मोटार सायकलवरून आम्हास पाठवले. त्यावरून मी, पंच नं 1 कविटकर यांच्यासह पोलीस वलेकर यांची करमाळा पोलीस ठाणे येथे भेट घेवून माझ्या कामाबाबत चर्चा करत असताना, पोलीस वलेकर यांनी मी व माझी पत्नी, मुलगा यांच्यावर गुन्हा दाखल असल्याचे सांगितले. त्यानंतर मी पोलीस वलेकर यांची भेट घेण्यासाठी गेलो तेव्हा मला पोलीस वलेकर म्हणाले की, i सांगितली if अशी चर्चा करुन पोलीस वलेकर यांनी माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम चार वाजे पर्यंत करमाळा पोलीस ठाणेस घेवून येण्यास सांगितले. त्यावरून मी व पंच नं.1 कविटकर असे नियोजित ठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील रेकार्डर काढून पंच नं.1 कविटकर व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी, व पंचांनी रेकडरमध्ये माझ्यात आणि पोलीस वलेकर यांच्यात झालेले संभाषण त्यांच्याकडील लपटपला रेकर्डर जोडून ऐकले. त्यामध्ये पोलीस यांनी 10,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. पुरवणी पान क्रं. 1 दिनांक 14.10.2021 रोजीचे संदिपान मारुती गलांडे यांचे फिर्यादी जबाबा लगतचे असे,परंतु माझ्याकडे 10,000/- रुपये नसल्याने पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी पोलीस यांना देण्यासाठी माझ्याकडे असलेले 7,000/- रूपये हजर केले. त्यात 2000/- रूपये दराची 01 नोट व 500/- रुपये दराच्या 10 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांनी कोऱ्या कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोनि कोळी व दोन्ही पंचानी सह्या केल्या. त्यानंतर पोलीसांनी त्यांच्यासोबत आणलेल्या पांढऱ्या रंगाच्या पावडरची माहिती देताना, सदरची पावडर ही ज्या वस्तुला लागेल ती वस्तु अंधारात चमकत असल्याचे, मात्र प्रकाशात सदरची पावडर दिसत नसल्याचे सांगुन त्याचे प्रात्येक्षीक करुन दाखविले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटां ना सदरची पावडर त्याच डब्बीत असलेल्या कापसाने लावुन वाहनात तात्पुरता अंधार करुन चमकत असल्याचे दाखविले. त्यानंतर यातील पोलीस वलेकर यांच्यावर करमाळा पोलीस ठाणे व परिसरात लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये मी व पंच नं 1 कविटकर असे दोघेजन मोटार सायकलवरुन व उर्वरीत सापळा पथक खाजगी जीपमधून करमाळा पोलीस ठाणे जवळ आलो. तेथे मी, पंच नं 1 कविटकर यांच्यासह पोलीस वलेकर यांची भेट घेतली असता तेथे पोलीस वलेकर हे हजर नसल्याने माझ्या जवळ असलेला माझ्या मुलाचा मोबाईलवरुन माझ्या विनंती वरुन पंच नं.1 कविटकर यांनी पोलीस वलेकर यांना फोन केला असता, त्यांनी करमाळा पोलीस ठाणेच्या डाव्याबाजूला थांबा असे सांगितले. थोडयावेळातच त्या ठिकाणी पोलीस वलेकर आले. त्यावेळी मी पंच नं.1 कविटकर असे पोलीस वलेकर यांची भेट घेतली असता, पोलीस वलेकर हे माझेसोबत करमाळा पोलीस ठाणेच्या बाजुला असलेल्या हटेल शिंगाडे येथे गेलो. तेथे चहा पित असताना पोलीस वलेकर मला म्हणाले की, n परत तिकड M.. तिकड आत मधी गेल्यावर P.. राहुदया त्याला हात नघा , त्यावर मी म्हणालो की, E त्यावर पोलीस वलेकर म्हणाले की,  त्यानंतर इतर चार्चा करत पोलीस वलेकर हे मला त्यांचा उजव्या हाताचा अंगठा उजव्या हाताचे तर्जनीवर घासुन पैशांची मागण्याचा ईशारा केला असता मी माझे शर्टाच्या खिशात ठेवलेली सात हजार रुपये लाचेची रक्कम काढून पोलीस वलेकर यांचेसमोर धरली असता, त्यांनी ती लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारुन सोबत आणलेल्या प्लास्टिक पिशवीमध्ये ठेवली. त्यावेळी पोलीस वलेकर यांनी उरलेले तीन हजार रुपये उदया देण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस वलेकर, मी व पंच नं.1 कविटकर हे चहा पेऊन शिंगाडे हटेलच्या बाहेर आल्यावर पंच नं.1 कविटकर यांनी इशारा केला असता ऍन्टी करप्शन पथकाने सदर ठिकाणी येवून पोलीस वलेकर यांना रंगेहात पकडले.त्यानंतर पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी यांनी खाजगी वाहन मध्ये दोन्ही पंचासमक्ष पोलीस वलेकर यांचे दोन्ही हातांची व प्लास्टिक पिशवीची पुरेसा अंधार करून पथकाकडे असलेल्या दिव्याच्या निळे प्रकाशात तपासणी केली असता, त्यांचे दोन्ही हातांच्या बोटाच्या पेऱ्यावर व प्लास्टीकच्या पिशवीच्या आतील बाजूस अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच सदर नोटांची देखील निळ्या दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर देखील पावडरची निळसर चकाकी दिसून आली. तसेच त्यांचेकडे मिळून आलेल्या नोटांची कागदावर नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. पोलीस वलेकर यांच्या ताब्यातुन घेतलेल्या सदरच्या नोटा व लाचेची रक्कम ठेवलेली प्लास्टीकची पिशवी पुराव्याकामी जप्त करण्यात आलेली आहे. पोलीसांनी माझे व पंचासमक्ष पोलीस वलेकर यास त्यांचे पुर्ण नांव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव शशिकांत तुकाराम वलेकर, वय 49 वर्षे, पोलीस नाईक/324, करमाळा पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, ता.करमाळा, जि.सोलापूर, रा. शेलगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर असे सांगितले. पोलीसांनी वलेकर यांना तपासकामी ताब्यात घेत असल्याचे पंचांना, मला व पथकातील पोलीसांना सांगितले. सदरबाबत सविस्तर सापळा पंचनामा शासकीय विश्रामगृह, करमाळा येथे दि. 14.10.2021 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी दि. 13.10.2021 रोजी 13.00 ते दि.14.10.2021 रोजी 00.20 वा. चे दरम्यान पोलीस नाईक/324 शशिकांत तुकाराम वलेकर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून 10,000/- रूपये लाचेची मागणी करून, पहिला टप्पा 7000/- रुपये लाचेची रक्कम पोलीस वलेकर यांनी हटेल शिंगाडे, येथे स्वत: स्विकारून त्यांनी स्वत:चा सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी  स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी शशिकांत तुकाराम वलेकर, वय 49 वर्षे, पोलीस नाईक/324, नेमणूक करमाळा पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, ता.करमाळा, जि.सोलापूर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम अन्वये फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लपटपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर तो माझ्या मुलाने मला वाचून दाखविला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा जबाब दिला स.ता.म  समक्ष  (चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक  ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

**13. Action** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

or (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): Pravin Dharma Sane

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**No.**(क्र.): DGPPDSM8905 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

सुदीपान मारुती गर्जे

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अंमलदार
... पोलिस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SURYKANT DEVRAO KOKANE

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN65805